RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक १६] मंगळवार, जून १६, २०२६/ज्येष्ठ २६, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.**— महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. .. | १-३ |


**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जून २०२६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VI OF 2026.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; २०१७ चा महा. ६.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ याच्या कलम १०९ मधील,— २०१७ चा महा. ६.

(१) पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) खंड (घ) मधील, दुसरे परंतुक वगळण्यात येईल;

(दोन) खंड (छ) मधील, विद्यमान दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, सन २०२६- २७ या शैक्षणिक वर्षासाठी, राज्य शासनास, ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अंतिम मान्यता देता येईल.";

(२) पोट-कलम (४) मध्ये, खंड (घ) मधील,—

(एक) दुसरे परंतुक व तक्ता वगळण्यात येईल;

(दोन) विद्यमान दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :-

" परंतु आणखी असे की, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी, राज्य शासनास, ३० जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाईट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी देता येईल.".

## निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम १०९ मध्ये, नविन महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्याच्या कार्यपद्धतीची तरतूद केलेली आहे. उक्त कलम १०९ च्या पोट-कलम (३) च्या खंड (छ) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी अंतिम मान्यता देता येईल आणि उक्त कलम १०९ च्या पोट-कलम (४) च्या खंड (घ) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, ज्या वर्षी परवानगी मागितली असेल, त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्यासाठी परवानगी देता येईल.

**२.** महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीच्या आदर्श आचारसंहितेमुळे उक्त कलम १०९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था, सुरू करण्याची आणि नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा किंवा अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्याची कार्यपद्धती पार पाडली जाऊ शकत नाही. म्हणून, उक्त कलम १०९ मध्ये सुयोग्य सुधारणा करून, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्यासाठी आणि नवीन अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकड्या किंवा सॅटेलाइट केंद्रे सुरू करण्यासाठी राज्य शासनाद्वारे अंतिम मान्यता किंवा परवानगी देण्याचा दिनांक वाढविणे इष्ट आहे, असे वाटते.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १६ जून २०२६.

**जिष्णु देव वर्मा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. वेणुगोपाल रेड्डी,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.